# प्रकरण दुसरे

## कामगारांचे स्थलांतर - सैध्दांतिक आढावा

२.१ प्रास्ताविक

२.२ स्थलांतराबाबत भारतीय अनुभव

२.३ स्थलांतराचा ऐतिहासिक अभ्यास

२.४ स्थलांतराची कारणे

२.५ स्थलांतरीत कोणाला म्हणावे ?

२.६ स्थलांतराचे गतिशास्त्र

२.७ स्थलांतराची दिशा व अंतर

२.८ ऐतिहासिक स्थलांतराचे प्रकार

२.९ आधुनिक स्थलांतराचे स्वरूप

२.१० स्थलांतरीत कामगारांची वैशिष्ट्ये

२.११ स्थलांतरीत कामगारांची सामाजिक आर्थिक स्थिती

२.१२ स्थलांतरीत कामगारांचे असंघटित स्वरूप

२.१३ कामगारांच्या स्थलांतर प्रवृत्तीचे दुष्परिणाम

२.१४ कामगारांच्या स्थलांतर प्रवृत्तीचे चांगले परिणाम

संदर्भ

# प्रकरण दुसरे

## कामगारांचे स्थलांतर - सैध्दांतिक आढावा

### २.१ प्रास्ताविक :

कामगारांच्या स्थलांतराच्या बाबतीत सैध्दांतिक वाङ्.मयात भरीव अशी वाढ झालेली आहे. लोकसंख्या स्थलांतराच्या बाबतीत मोठया प्रमाणात सैध्दांतिक माहिती उपलब्ध होत आहे. तसेच अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, लोकसंख्याशास्त्र व भूगोल यासारख्या विविध विषयांमध्ये मानवी संस्था व त्यांचे राहणीमान याबाबत संशोधन होत आहे. बहिर्गमन ही स्थलांतराच्या विस्तारित प्रक्रियेतील उप-प्रक्रिया असून, रोजगारासाठी एका देशातून दुस-या देशात स्थलांतर करणे म्हणजे बहिर्गमन होय. रोजगारासाठी जन्म ठिकाण सोडून रोजगाराच्या ठिकाणी स्थायिक होणे आणि रोजगारा-साठी जन्म ठिकाण सोडून दुस-या देशात जाऊन स्थायिक होणे असा त्याचा अर्थ होतो. याला पूरक उप-प्रक्रिया म्हणजे आगमन होय. दुस-या देशातील कामगाराचे आपल्या देशात स्थलांतर होणे, म्हणजेच आगमन होय. बहिर्गमन जन्मस्थळाचा त्याग दाखविते तर आगमन स्थलांतराचे अंतिम स्थान दाखविते. अशारीतीने स्थलांतराच्या प्रक्रियेतील वरील दोन उप-प्रक्रिया आहेत. थोडक्यात कामगारांचे स्थलांतर म्हणजे रोजगारासाठी जन्मठिकाण सोडून दुस-या नवीन ठिकाणी जाणे.

लोकसंख्या बदलातील स्थलांतर हा एक भाग आहे. तसेच ती एक मुलभूत प्रक्रिया आहे. लोकसंख्येचे आकारमान ठरविण्याच्या यंत्रणेतील तो एक घटक आहे. तसेच देशाच्या लोकसंख्येचे समायोजन किंवा संतुलनामधील स्थलांतर हा एक महत्वाचा घटक आहे. डर्कहेम यानी दाखवून दिलेले आहे की, समाजाच्या विकासाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये कामाची वाटणी व कार्यांचे विशेषीकरण यामध्ये स्थलांतर हा घटक महत्वाचा ठरलेला आहे.[१]

स्थलांतराचे स्वरूप हे मूळ ठिकाण व प्रवासाचे अंतिम ठिकाण यांच्या वैशिष्ठावरून अभ्यासले गेले आहे. स्थलांतरविषयक केल्या गेलेल्या विविध अभ्यासातील एक महत्वाचा धागा म्हणजे जन्म ठिकाणच्या आर्थिक वाईट परिस्थितीमुळे कामगार बाहेर ढकलला जाणे आणि दुसऱ्या ठिकाणच्या आर्थिक आकर्षणापोटी कामगार तिकडे ओढला जाणे म्हणजे स्थलांतराच्या उत्प्रेदाण व आकर्षण घटकांचे विश्लेषण आहे. स्थलांतराबाबतच्या विविध अर्थतज्ञानी स्थलांतराच्या प्रक्रियेतील अंतिम ठिकाणी मिळणारे आर्थिक लाभ यावर अधिक भर दिलेला आहे व त्याच बरोबर मूळ ठिकाणची आर्थिक दूरावस्था यासही महत्व दिलेले आहे. थोडक्यात वरील दुहेरी विचारसरणीनुसार, जेथे जास्तीतजास्त वेतन मिळण्याची शक्यता आहे तिकडे कामगार स्थलांतरीत होत असतात. तसेच कामगार आपले मूळ ठिकाण खेडयासाठी सोडतात की, तेथे वेतन कमी मिळते व तेथे पूर्ण बेरोजगार किंवा अर्धरोजगारीची स्थिती असते व त्याना सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

स्थलांतराच्या सिध्दांतामध्ये इ.एस.ली यानी प्रवासाच्या अंतिम ठिकाणाकडे आकर्षित करणारे घटक व मूळ ठिकाणच्या समस्या, मानववंश संबंधीचे प्रतिबंध, प्रवास खर्च आणि व्यक्तिगत घटक यासारख्या उत्प्रेदाण घटकावर भर दिलेला आहे.[२]

इ.एस. ली यानी स्थलांतरास जबाबदार असणाऱ्या घटकांची वर्गवारी चार गटात केलेली आहे.

१) स्थलांतराच्या मूळ ठिकाणाशी संबंधित घटक,

२) स्थलांतराच्या अंतिम ठिकाणाशी संबंधित घटक,

३) प्रतिबंधात्मक अडथळे,

४) वैयक्तिक घटक.

यावरून असे स्पष्ट होते की, स्थलांतरामध्ये सामाजिक आर्थिक रचना, संस्कृतीची चौकट, व्यक्तींची आकलन शक्ती महत्वाची असते. तरीही स्थलांतराच्या अंतिम ठिकाणाची आकर्षणे आणि मूळ ठिकाणच्या समस्या यांचा व्यक्तींच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीतील फरकाप्रमाणे भिन्न प्रभाव पडतो. त्यामुळेच अशा परिस्थितीत निवड हा घटकही महत्वाचा ठरतो.

अशिश बोस यांच्या मते उत्प्रेक्षण आकर्षण घटकांच्या आधारावर केले गेलेले स्थलांतराचे विश्लेषण अतिरिक्त सोपेपणामुळे वरवरचे वाटते. त्यांच्या मते वरील दोन्ही घटक लोकसंख्याशास्त्राशी संबंधित आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या परिस्थितीत केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातही आर्थिक दूरावस्थेमुळे स्थलांतर होत असते.[३] थोडक्यात स्थलांतराच्या प्रक्रियेत मूळ ठिकाणची आर्थिक दूरावस्था व अंतिम ठिकाणाचे आर्थिक आकर्षण या दोहोंचेही प्रमाण महत्वाचे आहे. तरीही ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर हे शहरी आकर्षणापेक्षा ग्रामीण आर्थिक दूरावस्थेवरच अधिक अवलंबून आहे.

एस.ए. स्टॉऊफर यांच्या मते स्थलांतराचे प्रमाण हे दोन ठिकाणामधील अंतराच्या विषम प्रमाणात व त्या ठिकाणच्या अनुकूलता व प्रतिकूलता यातील परस्पर विरोधी संबंधावर अवलंबून असते. तर दुसऱ्या बाजूने विचार करता स्थलांतर प्रमाण हे दोन ठिकाणच्या उपलब्ध संधीवर अवलंबून असते.[४]

स्थलांतराच्या अलिकडील लिखाणावरून हे स्पष्ट होत चाललेले आहे की, स्थलांतर हे मूळ ठिकाणाबद्दलचे आकर्षण आणि अंतिम ठिकाणचे आकर्षण या दोहोंवरही अवलंबून आहे. परंतु या दोन्ही घटकास वेगवेगळ्या व्यक्ती कमी अधिक महत्व देतील व त्या संदर्भात एखादी व्यक्ती कोणत्या ठिकाणी व किती काळ आहे हे ही घटक महत्वाचे असतात.

जे.सी. मिचेल यानी असे म्हटलेले आहे की, कोणत्या तरी एका घटकाच्या सहाय्याने केलेले स्थलांतराचे विवेचन अपुरे वाटते. तसेच सर्व घटकांची यादीही उपयुक्त ठरत नाही. त्यासाठी तर्कशास्त्राच्या चौकटीत विविधांगी कारणामध्ये सुसंगतपणा आणणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांनी ' केंद्रोपगामी परस्परसंबंधी प्रवृत्ती ' व ' केंद्रोपसारी परस्परसंबंधी प्रवृत्ती ' या दोन गटात वर्गवारी सुचविली आहे. तसेच त्याचे उपघटक म्हणून ' सामाजिक,'' मानसशास्त्रीय,' व ' आर्थिक ' घटकांचाही विचार केलेला आहे.[५]

बोग यांच्या मते अंतर्गत स्थलांतरात अशा प्रकारच्या निवडीचा घटक असतो आणि निवडीतील तफावतीचा विचार करताना स्थलांतराचे मूळ ठिकाण व स्थलांतराच्या अंतिम ठिकाणची परिस्थिती व तेथील लोकसंख्या यांचा एकत्रित विचार करावा लागतो.[६] स्थलांतराचे प्रमाण व रचना ठरविण्याचे सर्वसाधारणपणे रोजगार, उत्पन्न आणि जलद लोकसंख्या वाढ हे तीन महत्वाचे घटक आहेत असे आढळून येते. ज्या ठिकाणी नवीन रोजगार संधी निर्माण होत नाहीत, जेथे वेतनपातळी कमी आहे आणि जेथे लोकसंख्या जलद गतीने वाढते आहे तेथून स्थलांतराचा प्रवाह दुसरीकडे वाहत असतो. म्हणजेच ज्या ठिकाणी नव्याने औद्योगिक विकास घडून येतो आहे, जेथे दरडोई उत्पन्न जास्त आहे व जेथे जन्म व मृत्यू प्रमाणातील तफावत कमी आहे, म्हणजेच लोकसंख्या वाढीचा निव्वळ दर कमी आहे तिकडे कामगारांच्या स्थलांतराचा प्रवाह वाहत जातो.[७]

जोन पार याना असे आढळून आले की, ज्या भागात बेकारीची समस्या गंभीर आहे, जो भाग मागासलेला आहे तेथून बाहेरच्या दिशेने स्थलांतर होणे हे त्या भागावरील ताण कमी करणारे ठरते. देशाच्या

सामाजिक आर्थिक बदलाच्यावेळी समायोजन घडवून आणण्यामध्ये कामगार व लोकसंख्येचे देशाबाहेर स्थलांतर होणे सर्वसाधारण व ते अपेक्षितही आहे.[८]

परंतु अशा मागासलेल्या भागातून बाहेरच्या दिशेने होणाऱ्या स्थलांतरास विरोधही झालेला दिसतो. अशाप्रकारच्या बाहेरच्या दिशेने होणाऱ्या स्थलांतरामुळे त्या भागातील बेकारीची समस्या सोडविण्यास मदत होते असे म्हणणे धोकादायक सोपवळीकरण आहे. कारण बाहेरच्या दिशेने होणारे स्थलांतर हे अप्रत्यक्षपणे बेकारीस कारणही ठरत असते. बाहेरच्या दिशेने होणाऱ्या स्थलांतराचा महत्वाचा दोष म्हणजे त्या भागातून कार्यक्षम कामगारच बाहेर ओढले जातात व त्यामुळे अशा कामगारांची त्या भागात दुर्मिळता निर्माण होते. गुन्नर मिरदालच्या म्हणण्याप्रमाणे या प्रकारच्या शक्ती -हासासच एकप्रकारचा प्रतिसारक परिणाम म्हटले जाते.[९] यामुळे भविष्यकाळात या भागात नवीन उद्योगधंदे सुरू करण्याबाबत उद्योजकांच्यामध्ये आकर्षणही रहात नाही आणि अस्तित्वात असलेल्या उद्योगांच्या विकासातही अडथळे निर्माण होतात.

अशा मागासलेल्या भागाच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय म्हणून जोन पार यानी खालील दोन दृष्टिकोन सुचविले आहेत :

१) नवीन आर्थिक कृतींना चालना देऊन त्या भागातच कामगारांना काम उपलब्ध होईल असे धोरण स्वीकारणे.
२) बाजारपेठेची अशी पुनर्रचना करणे की ज्यामुळे अतिरिक्त श्रम पुरवठा असणाऱ्या भागातून कामगारांचे स्थलांतर होईल.[१०]

अॅन्डरसन (१९५६) यानी असे सुचविलेले आहे की, उत्प्रेक्षण आकर्षण या संकल्पनेनुसार त्या ठिकाणचा निव्वळ स्थलांतराचा दर ठरविता येतो. जर एखाद्या भागात आकर्षण घटकाचे प्राबल्य अधिक असेल

तर त्या भागात निव्वळ आगमनाचा दर जास्त असतो व ज्या भागात उत्प्रेदाण या घटकाचे प्राबल्य असते, त्या भागातून निव्वळ निर्गमनाचा दर जास्त असतो.[११]

लॅन्डिज (१९४६) यानी या संकल्पनेची तुलना ऐच्छिक व अनिवार्य स्थलांतराशी केलेली आहे. त्यांच्या मते ज्या भागात नैसर्गिक साधनांची सुबत्ता आहे किंवा ज्या भागात स्थलांतरीतांना अधिक वरचा सामाजिक आर्थिक दर्जा मिळतो, तिकडे ऐच्छिक स्थलांतर होते. तसेच ज्या भागात कामगार आर्थिक सामाजिक दडपणाखाली आहेत त्यातून सुटका करून घेण्यासाठी तेथून अनिवार्यपणे त्यांचे स्थलांतर होत राहते.[१२]

बर्ज[१३] यानी स्थलांतरास जबाबदार असणाऱ्या घटकांची यादी खालील प्रमाणे दिलेली आहे :

१) खेड्यातील कामगारांची रिकाम्या वेळेत पैशातील उत्पन्न मिळविण्याच्या इच्छेची तिव्रता.
२) त्याला खेड्यातील उत्पादन व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची पातळी.
३) उत्पन्न मिळविण्याच्या उद्देशाने त्याने खेड्यात केलेल्या कष्टाची परिश्रम किंमत.
४) बाहेरच्या खेड्यात उत्पन्न प्राप्तीसाठी त्याला कराव्या लागणाऱ्या कष्टाची परिश्रम किंमत.

अंतर्गत स्थलांतराच्या अभ्यासामध्ये सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे चार प्रवाह आढळून येतात :

१) खेड्यातून खेड्याकडे होणारे स्थलांतर.
२) खेड्यातून शहराकडे होणारे स्थलांतर.
३) शहरातून शहराकडे होणारे स्थलांतर.
४) शहरातून खेड्याकडे होणारे स्थलांतर.

अति विकसित शहरी भागाकडे ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर व त्याचे ग्रामीण भाग व शहरावर काय परिणाम होतात याचा विस्तृतपणे अभ्यास झालेला आहे. परंतु खेडयातून बाहेरच्या दिशेने होणा-या स्थलांतराची कारणमीमांसा व परिणाम यांचा विस्तृत अभ्यास होणे हे अधिक महत्वाचे आहे.

२.२ स्थलांतराबाबत भारतीय अनुभव :

भारतामध्ये अंतर्गत स्थलांतराबाबत प्रमुख विश्लेषण हे जन्म ठिकाणच्या आकडेवारीवरून राज्य पातळीवरच झालेले आहे. झाकेरिया यांनी १९०१-३१ आणि १९४१-५१ या काळासाठी भारतांतर्गत स्थलांतराचा अभ्यास केला. त्यामध्ये मुख्यत: स्थलांतराचे प्रमाण किती आहे व त्यामुळे त्याचा काय परिणाम होतो हे शोधणे हे हेतू होते.[१४]

१९५० च्या दरम्यान नियोजन मंडळाच्या संशोधन कार्यक्रम कमिटीने पुरस्कृत केलेले भारतातील मोठया शहरांचे सर्वेक्षण व त्यानुसार स्थलांतरीत कामगारांच्या वैशिष्ट्यांचे वर्णन केलेले आहे.[१५]

भारतातील खेडयातील परिस्थितीमुळे कामगार शहराकडे आकर्षिले जात नाहीत तर ते खेडयांतून शहरांकडे ढकलले जातात.[१६] भारतामध्ये कामगारांचे अंतर्गत स्थलांतर जास्त असण्याचे कारण म्हणजे कामगारांची प्रवासी वृत्ती होय. शेतीवरील लोकसंख्येचा वाढता भार, ग्रामीण कर्ज-बाजारीपणा, ग्रामोद्योगांचा -हास, संयुक्त कुटुंब पध्दती व कौटुंबिक संघर्ष यामुळे कामगार खेडयांतून शहराकडे ढकलला जातो. शिवाय शहरातील जागेचा प्रश्न, गलिच्छ वस्त्या, शहरातील धावपळीचे व कृत्रिम जीवन, कामगारांचे कुटुंब खेडयातच असते. त्यामुळे तो खेडयास वारंवार भेट देत असतो. वरील कारणामुळे अनेक औद्योगिक कामगारांची खेडयांतून शहराकडे व शहरातून खेडयाकडे सारखी ये-जा सुरू असते.

बिहार श्रम चौकशी समितीने टाटानगर औद्योगिक केंद्रात राहणाऱ्या कामगारांची पाहणी केल्यानंतर असे आढळून आले की, नातलगांची भेटे घेणे, सामाजिक समारंभात भाग घेणे, धार्मिक उत्सवात भाग घेणे, घराची दुरूस्ती करणे, शेती कामात भाग घेणे यासाठी ते खेड्यास वारंवार भेट देतात. यावरून भारताच्या औद्योगिक कामगारांच्या अंतर्गत स्थलांतराचे कारण हे केवळ आर्थिक नसून प्रामुख्याने कौटुंबिक व सामाजिक स्वरूपाचे आहे असे म्हणता येईल.[१७]

बी.आर. शर्मा यांनी भारतातील अंतर्गत स्थलांतराचे किंवा औद्योगिक कामगारांच्या ग्रामीण पार्श्वभूमीचे काही महत्वाच्या अभ्यासाचे निष्कर्ष खाली दिलेले आहेत.[१८]

ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या कामगारांची एकूण औद्योगिक कामगारांशी टक्केवारी -

| | | |
|---|---|---|
| १) के.एन. वैद (१९६४, कोटा) | ... | ५७ टक्के |
| २) बलदेव शर्मा (१९६५, मुंबई) | ... | ४७ टक्के |
| ३) आर.सी. गोयल (१९६८, अहमदाबाद) | | ५२ टक्के |
| ४) बलदेव शर्मा (१९६९, बंगलोर) | ... | २७ टक्के |

अशारितीने वरील अभ्यासात भारताच्या अंतर्गत स्थलांतराची कारणे व स्थलांतरीत कामगारांची वैशिष्टये यावर भर दिलेला आहे.

सोनी एन.के. यानी भारतीय स्थलांतराचे पैलू या नावाचा जो लेख लिहिला आहे, यामध्ये १९७१ व १९८१ च्या जनगणनेवरून स्थलांतरविषयक जी आकडेवारी मिळते, त्यावरून भारतातील स्त्री व पुरूषांच्या स्थलांतराची कारणे व प्रकार यांची काही ठळक वैशिष्टये आढळून येतात असे म्हटले आहे. त्यांच्या मते उपलब्ध आकडेवारीवरून असे दिसते की राज्याराज्यात स्त्री-पुरूषांचे जे

स्थलांतर होते ते प्रामुख्याने ग्रामीण भागातून ग्रामीण भागाकडे व शहरी भागातून शहरी भागाकडे असे दोन्हीही प्रकारचे होत असते. पुरूषांच्या बाबत या प्रकारचे स्थलांतर हे प्रामुख्याने रोजगार मिळविण्यासाठी तर स्त्रियांचे स्थलांतर हे प्रामुख्याने त्यांचा विवाह होऊन सासरी जाण्याच्या कारणावरून होत असते. तसेच शिक्षण हेही एक स्थलांतराचे कारण स्त्री-पुरूष या दोहोंच्या बाबतीत आढळून येते.[१९]

२.३ स्थलांतराचा ऐतिहासिक अभ्यास :

ऐतिहासिकदृष्टया स्थलांतरीत कामगारांचे दोन प्रकार मानलेले आहेत. ते म्हणजे देशांतर्गत स्थलांतर व आंतरराष्ट्रीय स्थलांतर असे म्हणता येईल. देशांतर्गत स्थलांतर हे देशातल्या देशात होत असते तर आंतरराष्ट्रीय स्थलांतर हे देशाबाहेर होत असते. असे स्थलांतर प्रामुख्याने दुसऱ्या देशातील आकर्षक काम मिळविण्याच्या उद्देशाने होत असते. आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे व्यक्तिगत निर्णय प्रामुख्याने खालील दोन आर्थिक प्रेरणांच्या आधारे घेतले जातात :

१) उत्पन्न प्राप्तीच्या अपेक्षांचे कमालीकरण.
२) बेकारी किमान करण्यासाठी किंवा रोजगार प्राप्तीसाठी करावी लागणारी प्रतिक्षा कमी करणे.

ब्रीनले थॉमस यांच्या मते गरीब देशातून श्रीमंत देशाकडे कामगारांचे स्थलांतर होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे दोन देशातील उत्पन्न पातळीतील फरकामुळे वेतन पातळीत विविधता व भिन्नता असणे हे होय.[२०]

या आर्थिक घटकाच्या व्यतिरिक्त देशाबाहेरील स्थलांतरास आणखी काही गोष्टी कारणीभूत ठरतात. उदा. वय, लिंग, शिक्षण, अनुभव आणि इतर देशातील नातेवाईकांशी असलेले संबंध इत्यादी. परदेशातील काही उद्योग संस्था नेमणूकीच्यावेळी कामगारांना प्रवास खर्च व अन्य काही

सवलती देऊ करतात, त्यामुळेही काही प्रमाणात देशाबाहेरील स्थलांतरास चालना मिळते.

पश्चिम युरोपमध्ये (विशेषत: जर्मनी व स्वित्झर्लॅन्डमध्ये) सरळ सरळ खालच्या दर्जाच्या कामासाठी प्रत्यक्षपणे कामगारांची भरती केली जाते. त्यामुळे त्यांचा जो आर्थिक तोटा होतो त्यासाठी त्याना निवारा, शिक्षण विषयक सोयी व काही प्रमाणात राजकीय हक्क देऊ केले जातात. परंतु याबाबत कॅस्टल्स व कोसाक यानी काही प्रमाणात मतभिन्नता व्यक्त केली आहे. यांच्या दृष्टिकोनातून सामाजिक व आर्थिक घटक ही स्थलांतरास कारणीभूत ठरतात. उदा. जात, रंग, भाषा, धर्म इत्यादी. याहीपुढे जाऊन ते म्हणतात की, या स्थलांतरीत मजुरांचे खाजगी हक्क समाजाकडून संरक्षित केले जात नाहीत व परिणामी तो एक समाजाचा शोषित वर्ग बनतो.[२१] ब्रिटिशांनी अशाप्रकारच्या स्थलांतरीत कामगारांना तेथील स्थानिक समाज रचनेनुसार कायदेशीर आणि राजकीयदृष्टया दुय्यम स्थान दिलेले आहे.

देशांतर्गत स्थलांतर हे देशातल्या देशातच कामगारांनी अर्थपूर्ण रोजगार मिळविण्याच्या उद्देशाने वैयक्तिकपणे किंवा गटागटाने केलेले असते. स्थलांतर विषयक अगदी सुरुवातीच्या अभ्यासामधून सर्वसाधारणपणे असे दिसते की साधारणत: तरूण व अधिक शिक्षित कामगारांचेच खेडयातून शहराकडे स्थलांतर होते. ब-याच अर्थमिती अभ्यासातून असे सिध्द झालेले आहे की, कामगारांचे स्थलांतर हे आर्थिक फायदे मिळविण्याच्या उद्देशाने मागासलेल्या भागातून अधिक उत्पन्न देणा-या व रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध असणा-या भागात होत असते.[२२] त्याचप्रमाणे एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी होणा-या लोकसंख्येच्या स्थलांतरास त्या दोन ठिकाणच्या वेतनदरातील भिन्नता हा घटक प्रामुख्याने जबाबदार असतो.

शेतमजुरांचे शहरी भागाकडे किंवा औद्योगिक केंद्राकडे सातत्याने व मोठया प्रमाणात जे स्थलांतर होत असते, त्याच्या पाठीमागे उत्प्रेरण व आकर्षण हेच घटक कार्यरत असतात. यामुळेच शहरी लोकसंख्या जलद गतीने वाढते व शहरी भागावर किंवा औद्योगिक केंद्रावर आर्थिक ताण वाढत जातो.[२३]

सर्वसाधारणपणे कृषि क्षेत्राकडून बिगर कृषि क्षेत्राकडे (विशेषत: औद्योगिक क्षेत्राकडे) होणाऱ्या कामगारांच्या हालचालीस कामगारांचे स्थलांतर होणे असे म्हटले जाते. स्थलांतरीत झालेले मजूर हे मुख्यत: कृषि क्षेत्रातीलच असतात. सर्वसाधारणपणे शेती हंगामाच्या काळात जी कामे करावी लागतात त्यासाठी विशिष्ट कौशल्याची फारशी गरज नसते. स्थलांतरीत मजूर हे कापूस वेचणे, द्राक्षे तोडणे व तंबाखूच्या पानाचा खुडा करणे अशी कामे करतात. शिवाय गहू व इतर प्रकारच्या धान्याच्या पिकांची कापणी व ऊस तोडणी करण्याचे कामही करतात. त्याचप्रमाणे हे मजूर वीट भट्टी व दगडाच्या खाणीतही काम करतात. कारण अशा कामासाठी दणकट शरीराची गरज असते. अशाप्रकारचे अकुशल मजूर आसपासच्या खेडयातूनच येत असतात.

२.४ <u>स्थलांतराची कारणे</u> :

स्थलांतराची नेमकी कारणे सांगणे गुंतागुंतीचे आहे. तरी ही स्थलांतराचे मुख्य कारण म्हणजे शेती आणि ग्रामीण भागातील उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्रीवर लोकसंख्येचा वाढता भार हे सांगता येईल. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या कुटिरोद्योगातून व ग्रामोद्योगातून ग्रामीण लोकांना रोजगार पुरविला जात होता. त्याच उद्योगाचा सातत्याने व मोठया प्रमाणात ऱ्हास होत चालला आहे. याचबरोबर वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीवरील भार सातत्याने वाढत असल्याने शेतीच्या धारणक्षेत्राची अर्थक्षमता कमी होत



A

चाललेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात वाढती बेकारी, दारिद्र्य व कर्जबाजारीपणा या समस्या गंभीर होत आहेत. सीमांत व अल्पभूधारक शेतकरी आणि ग्रामीण कारागीरांना खेड्यात उपजीविकेस व सावकारांचे कर्ज फेडण्यास पैसा अपुरा पडू लागल्याने ते रोजगारीच्या शोधात कारखान्याकडे स्थलांतरीत होऊ लागलेले आहेत. अशारितीने कमी उत्पन्न पातळी, रोजगार संधीचा अभाव, संयुक्त कुटुंबपध्दती व कौटुंबिक संघर्ष यासारखे उत्प्रेक्षण घटक मजुरांना जन्म ठिकाणाहून बाहेर ढकलण्यास जबाबदार ठरत आहेत. तर अधिक उत्पन्न मिळविण्याची अपेक्षा व शहरी विभागाचे आकर्षण यामुळे ते शहरी भागाकडे ओढले जात आहेत. अशारितीने उत्प्रेक्षण व आकर्षण या दोन घटकामुळेच प्रामुख्याने स्थलांतर घडून येते.

जरी उत्प्रेक्षण व आकर्षण हे दोन्ही घटक एकत्रितपणे काम करीत असले तरी त्यांच्यातील अधिक प्रभावी घटक कोणता हे शोधणे शक्य आहे. थोडक्यात स्थलांतराचे विश्लेषण हे या दोन घटकांच्या आधारेच केले जाते. मजुरांची उत्पन्न पातळी व राहणीमान कमी झाल्यामुळे स्थलांतर होते तेव्हा तो शहराकडे ढकलला जातो आणि दुसऱ्या बाजूने विचार केला तर आपण शहरात अधिक उत्पन्न मिळवू व अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील या अपेक्षेने कामगारांचे स्थलांतर होत असेल तर ते शहराकडे आकर्षिले जातात असे म्हणता येईल.

## २.५ स्थलांतरीत कोणाला म्हणावे ?

वरील विवेचनावरून आपणापुढे सहज प्रश्न उभा राहतो की स्थलांतरीत मजूर कोण आहेत ? स्थलांतरीत मजूर हे प्रामुख्याने खेड्यातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दुय्यम दर्जा असलेलेच दिसतात. त्याच बरोबर यामध्ये भूमीहीन शेतमजूरांचा भरणा अधिक असलेला दिसतो. या ठिकाणी स्थलांतराला उत्प्रेक्षण घटकच अधिक प्रमाणात कारणीभूत ठरतात.

याच बरोबर एखाद्या वर्षी शेतीतील पिक चांगले नसेल तर अल्प भूधारकही त्या वर्षाच्या उपजिविकेसाठी उत्पन्न मिळविण्यासाठी म्हणून रोजगाराच्या शोधात शहराकडे धाव घेतात. यावेळी स्थलांतरास आकर्षण हा घटक अधिक प्रभावी ठरतो.

तसेच स्थलांतरास वरील आर्थिक घटकाशिवाय काही सामाजिक घटकही कारणीभूत ठरतात. यामध्ये प्रामुख्याने खेड्यात उच्च शिक्षणासाठी अपु-या सुविधा औषधोपचारासाठी पैशांची गरज, सण, उत्सव व लग्न कार्यांसाठी पैशांची गरज, तसेच कालबाह्य व परंपरागत समाजव्यवस्था या घटकांचा समावेश होतो. याचबरोबर एकत्र कुटुंबपध्दती, कौटुंबिक समस्या, दु:ख व भांडणे याने पीडित असलेले मजूरही रोजगाराच्या शोधासाठी शहराकडे स्थलांतरीत होत असतात, किंवा कारखान्याकडे कामासाठी धाव घेत असतात.

२.६ <u>स्थलांतराचे गतीशास्त्र</u> :

मनुष्य जन्मत:च अस्थिर व भटक्या वृत्तीचा आहे म्हणून तो स्थलांतर करतो. याहीपेक्षा स्थलांतराचे अधिक स्पष्टीकरण करणे गरजेचे असल्याने उत्प्रेक्षण आकर्षण संकल्पनेचाच अधिक शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.[२४]

काही वेळेला कामगार त्यांच्या मूळ ठिकाणच्या परिस्थितीमुळे बाहेर ढकलले जातात.उदा. त्यांच्या भागातील नैसर्गिक साधन संपत्ती संपुष्टात येणे, तर काही वेळेला ते नवीन विभागाकडे आकर्षित होतात कारण त्यांना त्या ठिकाणच्या चांगल्या रोजगार संधीचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारावयाची असते.

काही संशोधकांच्या मते स्थलांतर हे पूर्णपणे उत्प्रेक्षण घटकामुळेच होत असते तर काहींच्या मते स्थलांतर हे पूर्णपणे आकर्षण या घटकावर अवलंबून असते. वरील दोन्हीही मताचा प्रत्यय येतो. कारण काही विशिष्ट

परिस्थितीत स्थलांतर हे पूर्णपणे उत्प्रेक्षण घटकावरच अवलंबून असते, उदा. दुष्काळी परिस्थिती. तर काही वेळेला ते पूर्णपणे आकर्षण या घटकावर अवलंबून असते. उदाहरणार्थ नवीन सोन्याच्या खाणीचा शोध लागला तर लोकांची तिकडे कामासाठी झुंबड उडालेली दिसून येते. परंतु ब-याच वेळेला हे दोन्हींही घटक स्थलांतरास तितकेच जबाबदार असतात. परंतु अति विकसित देशांना मात्र स्थलांतराचा हा नियम लागू पडत नाही, कारण अशा देशात दोन विभागातील आर्थिक तफावतीमुळे होणारे स्थलांतर क्वचितच आढळते. तर एखाद्या भागाचा पुरेशा विकास झालेला नसेल तर मात्र तेथे उत्प्रेक्षण घटकामुळेच स्थलांतर घडून येते. कारण आशिया खंडाच्या पूर्वमध्य भागात व अलिकडेच आफ्रिकेमध्ये अशाप्रकारचे स्थलांतर झालेले आढळते. काही विचारवंताच्या मते शेतीतील मंदीमुळे व शहरातील आर्थिक संधीच्या अपेक्षेने खेडयातून शहराकडे स्थलांतराचा प्रवाह वाहत राहतो. त्यामुळेच अतिशहरीकरण घडून येते, हा विचार काही विचारवंत आग्रहाने मांडतात.

## २.७ <u>स्थलांतराची दिशा व अंतर</u> :

दोन प्रदेशामध्ये जर अंतर्गत दळणवळण साधले जात असेल तर स्थलांतर घडून येते असे स्पष्टपणे दिसून येते. यासाठी स्थलांतराच्या अंतिम ठिकाणाच्या परिस्थितीची माहिती मूळ ठिकाणी उपलब्ध झाली पाहिजे. ही स्थलांतराची प्राथमिक अट मानता येईल. स्थलांतराचे प्रमाण व अंतर यांच्यामध्ये परस्परविरोधी संबंध असतो. अशाप्रकारचा निष्कर्ष प्रथम ब्रिटनमधील संख्याशास्त्रज्ञ इ.आर. रवेनस्टेन यानी मांडला आहे. यानी १८८५ मध्ये ` स्थलांतराचा नियम ` या नावाचे जे पुस्तक प्रकाशित केलेले आहे त्यामध्ये त्यानी म्हटलेले आहे की, स्थलांतरितापैकी फार मोठया प्रमाणात लोक कमी अंतराचे स्थलांतर करतात.[२५]

स्थलांतरासाठी केवळ भौगोलिक अंतरच नव्हे तर तांत्रिक अंतर (उपलब्ध वाहतूक व दळणवळण साधनांच्या संदर्भात अंतर) आणि सामाजिक अंतर ही महत्वाचे मानले जाते. सामाजिक अंतर धार्मिक व भाषिक फरकानुसार निर्माण होते व त्यामुळे स्थलांतरावर मर्यादा पडतात.

भौगोलिक व सामाजिक अंतरातील फरक हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय व देशांर्गत स्थलांतरातील महत्वाचा भेद घटक आहे. म्हणजेच सहजासहजी संपर्क साधता येत असेल आणि भाषिक व धार्मिक अडथळे नसतील तर स्थलांतर सहज घडून येते.

एडवर्ड आर. रावेनस्टेन यानी स्थलांतराबाबत दुसरा नियम असा मांडलेला आहे की, अंतर्गत स्थलांतर हे विशिष्ट मार्गाने होत असून स्थलांतरही एक प्रक्रिया आहे व ती टप्प्याटप्प्याने होत असते व सर्वसाधारणपणे शेवटी त्या दूरच्या भौगोलिक ठिकाणीही होऊ शकते. मात्र औद्योगिक क्षेत्राकडे स्थलांतरीत होणारा मजूर प्रत्येक टप्प्यात मर्यादित अंतराचे स्थलांतर करतो.[२६]

स्थलांतरीत मजूर केवळ हळूहळू भौगोलिक अंतरच कापीत नसतात तर ते हळूहळू सामाजिक अंतरही कापीत असतात. स्थलांतर हे टप्प्याटप्पयाने होत असते म्हणजे स्थलांतर प्रथम ग्रामीण भागातून लहान व मध्यम आकाराच्या शहराकडे व शेवटी मोठया शहराकडे होत राहते.

जर्मनी, अमेरिका, स्विडन या देशात स्थलांतराबाबत जे विविध अभ्यास झाले आहेत त्यावरून असे दिसते की ग्रामीण भागातून शहरी भागाकडे जे स्थलांतरीत लोक होतात त्यांची बुध्दिमत्ता उच्चतर असते. ते अधिक शिक्षित असतात व त्यांचा सामाजिक-आर्थिक दर्जा उच्चतर असतो.

कौटुंबिक दर्जा आणि कुटुंबातील घटक यांचा विचार करता सर्वसाधारणपणे असे दिसते की, अपत्यहीन जोडपी किंवा अल्पवयीन अपत्ये असणारी कुटुंबे मोठी मुले असणाऱ्या कुटुंबापेक्षा अधिक स्थलांतर करतात.

अलिकडील काळात असे आढळून येते की, निवडक लोकांचेच म्हणजे ज्यांनी विशेष प्राविण्य धारण केलेले आहे व जे उच्च शिक्षित आहेत असे लोक मागासलेल्या देशांतून विकसित देशाकडे स्थलांतरित होत असतात. उदाहरणार्थ इंजिनिअर्स, डॉक्टर्स, शास्त्रज्ञ वगैरे.

काही वेळेला ब्रिटन सारख्या कमी समृध्द असणाऱ्या देशातून अमेरिकेसारख्या अत्युच्च समृध्दीच्या शिखरावर असणाऱ्या देशाकडे बुध्दिवंतांचे जे स्थलांतर होते त्यास बुध्दिमत्ता गळती असे म्हणतात.

काही वेळेस वांशिक उगम किंवा जातमातीच्या घटकावरून स्थलांतर करण्याची निवड होते. त्यामध्ये मुख्यत: सांस्कृतिक किंवा सामाजिक कारणे महत्वाची ठरतात.

२.८ <u>ऐतिहासिक स्थलांतराचे प्रकार</u> :

युगानुयुगे मानवजातीचे जे विविध प्रकारचे स्थलांतर होत आलेले आहे, त्याचे वर्गीकरण विविध लेखकांनी खालील प्रमुख प्रकारात केलेले आहे.

२.८.१ <u>प्राचीनकालीन स्थलांतर</u> -

प्राचीन काळी मानव जातीमध्ये झालेले स्थलांतर हे प्रामुख्याने काही उत्प्रेक्षण घटकामुळेच झालेले आहे. उदाहरणार्थ दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची असमर्थता तसेच प्रबळ शत्रूशी सामना करणे अशक्य झाल्याने टोळीटोळीने मानवजातीचे होणारे स्थलांतर असे स्थलांतर काही वेळेस स्वच्छेने झालेले आहे.

२.८.२ मुक्त स्थलांतर -

जेव्हा कोणत्याही प्रकारचे उत्प्रेदाण घटक किंवा राजकीय दबाव नसताना काही लोकांनी मूळ ठिकाणाहून नवीन अशा वेगवेगळ्या ठिकाणी स्वच्छेने स्थलांतर केलेले आहे त्यास मुक्त स्थलांतर असे म्हणतात. अशा मुक्त स्थलांतरात स्थलांतराच्या परंपरातून उगम व अंतिम स्थान यांच्यात संपर्क माध्यमे स्थापन झालेली असत नाहीत.

२.८.३ साखळी स्थलांतर -

साखळी स्थलांतर म्हणजे सुरुवातीस ज्यांनी स्थलांतर केलेले आहे त्यांचे अनुकरण म्हणून मोठया प्रमाणात सातत्याने स्थलांतर होत राहणे होय. सुरुवातीस स्थलांतरीत झालेले लोक पत्राद्वारे, प्रत्यक्ष भेटी, मित्रत्व व नातेवाईक यासारख्या मार्गाने संपर्क साधून व एकमेकांशी संबंध निर्माण करून सुरुवातीच्या स्थलांतरीत झालेल्या व्यक्तींच्या मदतीने स्थलांतर करीत राहतात. अशाप्रकारे एखाद्या स्थलांतराची साखळी सुरु झाली की वर्षानुवर्षे हजारो लोक स्थलांतरीत होत असतात.

२.८.४ सामुहिक स्थलांतर -

१९ व्या शतकामध्ये दूर अंतरावरील साहुहिक स्थलांतर हा एक नवीन स्थलांतराचा प्रकार अस्तित्वात आणण्यास प्रामुख्याने साखळी स्थलांतर प्रकाराने मदत केलेली आहे. अशाप्रकारचे सामुहिक स्थलांतर १८२० ते १८७० च्या दरम्यान युरोपमधून उत्तर अमेरिकेत झालेले आहे.

२.९ आधुनिक स्थलांतराचे स्वरूप :

अलिकडच्या काळात दळणवळण साधनांचा विस्तृत प्रमाणात विकास झालेला असल्यामुळे पूर्वीच्या साखळी पध्दतीतील स्थलांतराप्रमाणे आधुनिक स्थलांतर हे व्यक्तिगत संदेश किंवा व्यक्तिगत प्रगती किंवा संबंधावरती अवलंबून

राहिलेली नाही. अलिकडच्या काळात लोकांना ज्या ठिकाणी स्थलांतर करावयाचे त्या ठिकाणची माहिती वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन यासारख्या प्रसार माध्यमातून व श्रम विनिमय संस्था व स्थलांतरिताची आंतरराष्ट्रीय कार्यालये वगैरे.

२.९.१ ग्रामीण-शहरी स्थलांतर -

सध्याच्या आधुनिक जगामध्ये मानवी स्थलांतर हे खेड्यातून शहराकडे होत असताना दिसते. अर्थातच ही नवीन अशी घटना नाही. अनेक देशात घडून आलेल्या औद्योगिक क्रांतिमुळे स्थलांतराचा पूर्वीच्या रचनेचा अ नमुनाच बदलून टाकलेला आहे व आधुनिक स्थलांतर हे प्रामुख्याने औद्योगिक केंद्राकडे होऊ लागले आहे. अशाप्रकारचे स्थलांतर दोन विभागात आढळते. काही लोक अल्पकाळा-साठी व काही नेहमीसाठी स्थलांतरीत झालेले असतात. जे अल्पकाळासाठी स्थलांतरीत झालेले असतात ते पुन्हा आपल्या खेड्याकडे परतत असतात. अशा प्रकारे जे तात्पुरते स्थलांतरीत असतात त्यांची खेड्यातून शहराकडे व शहरातून खेड्याकडे सतत ये-जा सुरू असते कारण ते एक तर खेड्यांशी असलेले संबंध तोडू शकत नाहीत व दुसरे म्हणजे त्यांना शहरी जीवनाचे आकर्षण असते. परंतु शहरी जीवनातील अस्थिरता, तात्पुरता रोजगार, रहात्या घराची समस्या यामुळेच ते रोजगारीच्या ठिकाणी आपले कुटुंब करू शकत नाहीत. त्यांचे कुटुंब खेड्यामध्येच ठेवावे लागते त्यामुळे त्यांची खेडे ते शहर व शहर ते खेडे अशी सतत ये-जा सुरू असते. त्याचप्रमाणे तात्पुरत्या स्थलांतराचे महत्वाचे कारण म्हणजे दुष्काळ होय. दुष्काळी परिस्थितीत खेडूत औद्योगिक शहराकडे धाव घेतात व दुष्काळ संपल्यावर पुन्हा ते खेड्याकडे परतत असतात.

फिलमॉट यांच्या मते तात्कालिक स्वरूपाचे स्थलांतर हे फक्त अधिक पैसे मिळवून आपल्या मूळ ठिकाणी परत जाण्यासाठीच असते.[२७]

अशा प्रकारच्या स्थलांतरात स्थलांतरीत झालेली व्यक्ती परत आपल्या कुटुंबाकडे परतण्याची शक्यता जास्त असते. ब-याच कारखान्यातील अकुशल कामगार आजूबाजूच्या खेड्यातून आलेले असतात. त्या सर्वांचा आपल्या खेड्यांशी संबंध टिकून असतो. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राच्या दृष्टिकोनातून एक महत्वाची समस्या म्हणजे हे कामगार कायम स्वरूपी स्थलांतरीत झालेले नसतात तर कालकालीन स्वरूपाचे व स्थलांतरीत झालेले असतात.[२८]

मजुरांनी आपल्या खेड्यांशी संबंध टिकवून ठेवणे आवश्यक आहे हे श्रमविषयक शाही आयोगाचे मत आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये पूर्णपणे बरोबर नाही. १९४६ च्या श्रम चौकशी समितीने म्हटलेले आहे की खेड्यातील गैरसोयीमुळे व शहरातील सिनेमा, विद्युत रोषणाई, शाळा व महाविद्यालये या आकर्षणापोटी शहरामध्ये तो स्थायिक होऊ लागला आहे व खेड्या-बद्दलची ओढ हळहळ कमी होऊ लागलेली आहे. साहजिकच औद्योगिक क्षेत्रा-तील कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा करून तो ज्या कारणामुळे खेड्याकडे जातो, ती कारणे हळहळ कमी करणे गरजेचे आहे.

श्रम चौकशी समितीच्या मतानुसार औद्योगिक क्षेत्रात काम करणारे मजूर हे प्रामुख्याने भूमीहीन शेतमजूर असतात व ते प्रसंगानुसारच खेड्याकडे जात असतात. उदाहरणार्थ विश्रांती घेणे, सामाजिक कार्यक्रम साजरे करणे वगैरे.[२९]

दूरच्या अंतरावरून आलेले कामगार कामाच्या ठिकाणच्या बाजूस किंवा शहरात कायम वस्ती करून राहतात. दलित समाजातील औद्योगिक कामगारही शक्यतो खेड्याकडे जाऊ इच्छित नाहीत. तसेच स्थलांतरीत भूमीहीन शेत-मजूरही शहरामध्येच कायम राहू इच्छितात. अशा प्रकारच्या मजुरांना कायम स्वरूपाचे स्थलांतरीत असे म्हणता येईल. श्रम चौकशी समितीच्या मते औद्योगिक क्षेत्रात कामगारांचा स्थायी वर्ग निर्माण करावयाचा असेल तर कामगार ज्या उद्योगात काम करतो, त्या ठिकाणी कामाचे स्वरूप व

राहणीमानाबाबत सुधारणा केल्या पाहिजेत. अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसचा व अनेक कारखानदारांच्या मताचा दाखला देऊन श्रम चौकशी समितीने असे म्हटलेले आहे की, औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी कामगारांचा स्थायी वर्ग निर्माण होणे गरजेचे आहे. परंतु कामगारांना घर, वेतन, राहणीमान व कामगार कल्याण विषयक सुविधा पुरेशा प्रमाणात पुरविल्या शिवाय कामगारांच्या अल्पकालीन स्थलांतरावर मर्यादा येणार नाहीत. देशात औद्योगिक कामगारांचा एक स्थायी वर्ग निर्माण करण्याची जबाबदारी सरकार बरोबरच कारखानदार व सेवायोजकांनी स्वीकारली पाहिजे. कारण औद्योगिक कामगारांचा अस्थायी प्रवृत्तीचे प्रमाण केवळ कारखानदार व सेवा-योजकांवरच होत नाहीत, तर व्यापक दृष्टिकोनातून विचार केल्यास त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण कामगार चळवळीवर व देशाच्या औद्योगिक विकासावरही घडून येतात.

## २.१० स्थलांतरीत कामगारांची वैशिष्टे :

समान वैशिष्टये व प्रश्न असणाऱ्या इतर क्षेत्रातील कामगारापेक्षा स्थलांतरीत कामगारांचे वेगळेपण लक्षात घेणे आवश्यक आहे. रोजगार भरतीपेक्षा औद्योगिक रोजगाराची बांधिलकी मानणारा कामगार वर्ग निर्माण करणे कठीण असते. कामगारांची अशी बांधीलकी अनेक घटकांवर अवलंबून असली, तरी त्यामध्ये मुख्य जबाबदार घटक व्यवस्थापन हाच असतो. व्यवस्थापक किंवा मालक वर्गाची प्रवृत्ती किंवा ध्येय धोरणे यावरच बांधीलकी पत्करणाऱ्या कामगार वर्गाची निर्मिती अवलंबून असते. कामगारांना वाजवी वेतन देणे, कामगार कल्याण योजना राबविणे, कामगार संघटना चळवळीच्या विकासात अडथळे निर्माण न करणे अशी मालक वर्गाची प्रवृत्ती असेल तर स्थायी व जबाबदार कामगार वर्ग निर्माण होण्यास मदत होते. कामगारांची औद्योगिक रोजागाराशी बांधीलकी चार टप्प्यांतून उत्क्रांत होते.[३०]

२.१०.१ बांधीलकी नसणारा कामगार -

जे फक्त त्यांच्या तत्कालीन स्वरूपाच्या अडचणीमुळे औद्योगिक क्षेत्रात काही काळासाठी काम स्वीकारतात व तात्कालीन समस्या दूर झाली की परत खेड्याकडे जातात अशा कामगारांचा समावेश या गटात होतो.

२.१०.२ अंशत: बांधीलकी असणारा कामगार -

औद्योगिक रोजगार ही कायम स्वरूपी बाब आहे असे मानणारे परंतु मनाने ग्रामीण आहेत आणि खेड्याशी संबंध संबंध टिकवून ठेवणारे कामगार या गटात बसतात.

२.१०.३ सर्वसाधारण बांधीलकी असणारा कामगार -

जे औद्योगिक जीवनाशी समरस झालेले असतात व ज्यांचे जीवनमान पूर्णपणे औद्योगिक कामावर अवलंबून असते व त्यांचे खेड्याशी कोणत्याही प्रकारचे संबंध नसतात असे कामगार या गटात बसतात.

२.१०.४ विशेष बांधीलकी असणारा कामगार -

जे कामगार एखाद्या विशिष्ट व्यवसायात आणि विशिष्ट उद्योग-संस्थेत कायम होऊन तेथेच पूर्णपणे स्थायिक झालेले आहेत असे कामगार या गटात बसतात.

भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील कामगार हे तु मुख्यत: खेड्यातून आलेले असतात व त्यांचा संबंध आपल्या खेड्यांशी असतो. त्यामुळे त्यांच्यात गैरहजेरीचे प्रमाण अधिक असल्याने भारतीय औद्योगिक कामगारांच्यामध्ये जबाबदारीचे प्रमाण अतिशय कमी आहे. ते आपल्या कामाशी पूर्णत: एकनिष्ठ असलेला आढळून येत नाही. तसेच बदली कामगार व हंगामी कामगार यांच्यामध्ये कामाबाबत बांधीलकीची वृत्ती कमी असते. कारण बदली कामगार हा सतत कारखाना व मालक बदलत असतो. त्याचे राहण्याचे ठिकाण बदलत नसले तरी रोजगारीची जागा बदलत असतो, तर हंगामी किंवा अधिक कामगार हे हंगामापुरतेच कामावर असतात.

२.११ स्थलांतरीत कामगारांची सामाजिक आर्थिक परिस्थिती :

उपलब्ध रोजगार संधी आणि बेरोजगार यांच्यात समतोल साधणे ही बाब तितकिशी सोपी नाही. ती एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. कारण स्थलांतरीत कामगारांच्या बाबतीत श्रम बाजार हा विस्कळीत असतो.

काही किरकोळ अपवाद जर सोडले तर अशाप्रकारच्या स्थलांतरीत कामगारांना विशिष्ट पध्दतीने आणि नियमितपणे भरती करून घेण्यासाठी नियमित कामगार अधिकारी किंवा ठराविक पध्दती मालक वर्गाकडे असत नाहीत. असे कामगार दरवर्षी स्थलांतरित होऊन देखील त्यांचे रोजगारीचे हक्क राखून ठेवले जात नाहीत किंवा संघटित होत नाहीत. तसेच रोजगार शोधण्याची ठराविक पध्दतही त्यांच्याकडे असत नाही. सार्वजनिक रोजगार विनिमय (भरती) केंद्राकडूनही रोजगार मिळविण्याचा फारसा प्रयत्नही ते करीत नाहीत.

स्थलांतरीत कामगाराच्या असंघटित श्रम बाजारामुळे या कामगार भरतीमध्ये दलाल-ठेकेदार अशा तत्सम मध्यस्थांची चौकट निर्माण होते. या कामगारांना एकत्रित करणे, त्यांना रोजगारीच्या ठिकाणापर्यन्त आणणे, त्यांच्यावर परिवेक्षण करणे, त्यांच्यासाठी रोजगार शोधून त्यांचे संबंधी वेतन निश्चिती व कामाच्या अटी यासंबंधी करार करणे, त्यांना पगार देणे ही सर्व कामे ठेकेदारच करीत असतात.

रोजगारीच्या काही क्षेत्रात तर ठेकेदारांनी अशी स्थिती निर्माण करून ठेवलेली असते की स्थलांतरीत कामगार ठेकेदारांच्याशिवाय रोजगार शोधू शकत नाहीत व कारखानदार कामगार भरती करू शकत नाहीत.

वेतन कमी देणे, अधिक तास काम करून घेणे या मार्गाने स्थलांतरीत कामगारांचे आर्थिक शोषण केले जाते. शहरामध्ये त्यांना राहण्याची योग्य सोय नसते. साधी झोपडी किंवा पत्र्याची शेड बांधून झोपडपट्टीत रहावे

लागते. त्यामुळे बालमृत्यु, बाळंतपणात स्त्रियांचे मृत्यू, महारोग, हागवण, विषमज्वर, देवी व कांजिण्या इत्यादी प्रकारचे संसर्गजन्य रोग इतर लोकांच्या तुलनेने यांच्यात सर्वत्र अधिक प्रमाणात आढळतात.

शैक्षणिक पातळी, सामाजिक एकसंधपणा, राजकारणातील सहभाग यांचे स्थलांतरीत कामगारांच्यातील प्रमाण अत्यल्प आढळते, परंतु गुन्हेगारी व इतर अनेक सामाजिक दुर्गुण यांच्यात आढळतात.

' आज येथे तर उद्या तेथे ' अशा या कामगारांच्या वृत्तीमुळे त्यांची कामाची स्थिती व राहणीमानाच्या बाबतीत समस्या गंभीर व अधिक अडचणीच्या बनतात. स्थानिक, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सरकारामध्ये या स्थलांतरीत कामगारांच्या गंभीर समस्येची जाणीव निर्माण होऊ लागलेली आहे. या कामगारांच्या बाबतीत सरकारने व्यापक कायदे करावेत याबाबत आंतरराष्ट्रीय कामगार संघटना प्रयत्नशील आहे. कामगारांची स्थलांतराची वृत्ती कमी व्हावी व तो आपल्या कुटुंबासह कामाच्या ठिकाणीच स्थायिक व्हावा म्हणून त्यांच्यासाठी काही सुविधा पुरविल्या जात आहेत व काही नियंत्रणे घातली जात आहेत.

स्थलांतरीत कामगारांना सरकारी कायद्यानुसार संरक्षण व मदत देणे तसे गुंतागुंतीचे व अडचणीचे आहे. कामाच्या ठिकाणी किंवा जेथून कुटुंब पातळीवर किंवा समुहाने कामगारांचे स्थलांतर होते, तसेच स्थलांतराच्या प्रवाहावर नियंत्रणात्मक अटी लादण्याची गरज आहे.[३१]

एका दृष्टिकोनातून पाहिले तर यांत्रिकीकरण व कायम स्वरूपी स्थलांतर यामुळे तात्पुरते स्थलांतर करणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. परंतु दुसऱ्या बाजूने विचार करता अशा स्थलांतरीत कामगारांना शहरामध्ये एका ठिकाणी स्थायिक करून घेणे अवघड आहे. कारण त्यांच्याकडे शिक्षणाचा

व कुशलतेचा अभाव असतो, परिणामी त्यांच्या वाढत्या संख्येमुळे शहराच्या गरीब लोकसंख्येत भर पडते.

वर्षातील एकूण रोजगार मर्यादित असतो. तसेच स्थलांतरीत मजूर एकूण कामाच्या दिवसाच्या एक चतुर्थांश दिवसही काम करीत नाहीत. या कामगारांत बालकामगारांची संख्याही अधिक असते आणि काम न करणाऱ्या बालकांची योग्य देखभाल होत नाही. या कामगारांची बहुतेक मुले शाळेत जात नाहीत कारण कामाच्या ठिकाणी शाळेची सोय नसते व असल्यास त्या शाळांत या मुलांना प्रवेश मिळत नाही.

स्थलांतरीत कामगारांना सामाजिक लाभांपासून वंचित व्हावे लागू नये, त्यांना संरक्षण मिळावे व त्याचे सामाजिक हक्क अबाधित रहावेत यासाठी अलिकडे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने चळवळ सुरू केलेली आहे.[३२]

अलिकडच्या काही वर्षात आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने त्यांच्या सदस्य देशातील स्थलांतरीत कामगारांच्यासाठी सामाजिक आर्थिक सुरक्षिततेच्या योजना सुचविल्या आहेत. उदाहरणार्थ वैद्यकीय मदत, आजारपणाच्या काळात मदत, बाळंतपण व वार्धक्याच्या काळात व बेरोजगारीच्या काळात आर्थिक मदत आणि कुटुंब कल्याण वगैरे.

सामाजिक सुरक्षा विमा योजनेखाली अनेक द्विपक्षीय करार झालेले आहेत, परंतु बऱ्याच राज्यांनी त्यास प्रतिसाद न दिल्यामुळे स्थलांतरीत कामगारांच्या समस्या अजून तशाच राहिलेल्या आहेत.

२.१२ <u>स्थलांतरीत कामगारांचे असंघटित स्वरूप</u> :

असंघटित उद्योगातील कामगारांची विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध होत नाही. अशा उद्योगातील कामगार एखाद्या विशिष्ट व्याख्येने ओळखले जात नाहीत पण त्यांचे वर्णन करता येते. ते एखाद्या समान हेतूने प्रेरित होऊन संघटितही झालेले नाहीत कारण त्यांच्यावर खालील मर्यादा पडतात. उदा. १) रोजगारीचे किरकोळ स्वरूप, २) रोजगारीचे तात्पुरते स्वरूप, ३) अज्ञान आणि अशिक्षितपणा, ४) कारखान्याचे विस्कळीत स्वरूप. उदाहरणार्थ अ) बांधकाम उद्योगातील करारबध्द कामगार, ब) बदली कामगार, क) लघु-उद्योगातील कामगार, ड) बिडी व सिगारेट उद्योगातील कामगार, इ) वीट भट्टीवर काम करणारे मजूर, फ) हंगामी कामगार उदा. ऊसतोड कामगार व शेत मजूर, ग) झाडूवाले व भंगी, ह) भटके मजूर, ज) इतर असंघटित कामगार. अशाप्रकारच्या असंघटित उद्योगातील कामगारांची संख्या जवळजवळ २ कोटी इतकी असण्याची शक्यता आहे.[३३]

२.१३ <u>कामगारांच्या स्थलांतर प्रवृत्तीचे दुष्परिणाम</u> :

विकसनशील व बदलत्या समाज रचनेमध्ये आणि आधुनिक औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमध्ये स्थलांतर होणे साहजिकच आहे. परंतु स्थलांतराचे काही दुष्परिणामही दिसतात.

कामगारांच्या स्थलांतराच्या प्रवृत्तीमुळे त्यांची सतत खेडयाकडे ये-जा सुरू असते, तसेच ते कामावर वारंवार गैरहजर राहतात, त्यामुळे ते पुरेशा प्रमाणात प्रशिक्षण घेऊ शकत नाहीत त्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी राहते. या कामगारांना शहरात चाळ व झोपडपट्टीमध्ये रहावे लागते की जेथे स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ हवा व संडास, मुतारी व सांडपाण्याची

व्यवस्था नसते. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होऊन त्यांची कार्यक्षमता घटते.

कामगारांचे नैतिक अध:पतन होते. शहरातील जागेचा अभाव व गलिच्छ वस्त्या यामुळे त्याना आपले कुटुंब खेडयातच ठेवावे लागते. त्यामुळे त्यांना शहरात एकाकी जीवन जगावे लागत असल्यामुळे लवकरच हे कामगार जुगार, सट्टा, दारू व वेश्यागमन इत्यादी वाईट गोष्टींच्या आहारी जाऊन अनेक रोगांना बळी पडतात. ते वारंवार खेडयात जात असल्याने त्याचा संसर्ग खेडयातही होतो. अशा कामगारांच्या स्त्रियांना खेडयात एकटेच रहावे लागते, त्यामुळे काही वेळेस त्यांचेही अध:पतन होण्याची शक्यता असते.

याच बरोबर कामगारांच्या स्थलांतर प्रवृत्तीमुळे देशातील उत्पादन कार्यांवर विपरीत परिणाम होतात, कामगार चळवळीची प्रगती मंदावते, कारखानदार व कामगार यांच्यात चांगले संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत. कामगारांचे जीवन अस्थिर बनते.

कमी विकसीत देशात औद्योगिक विकासाची प्रक्रिया सुरू असताना कामगार गतीशील बनणे फायद्याचेच ठरते. परंतु कामगार हा विशिष्ट हेतूनेच गतिशील बनला पाहिजे. उदा. जेथे बेरोजगारीची समस्या गंभीर आहे तेथून जेथे सहज रोजगार संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे, तसेच अकुशल कामातून कुशल कामाकडे व कमी वेतन देणाऱ्या उद्योगातून अधिक वेतन देणाऱ्या उद्योगाकडे.

थोडक्यात स्थलांतर हे योग्य की अयोग्य हे स्थलांतराच्या परिणामावर अवलंबून आहे.

2.१४ कामगारांच्या स्थलांतरवृत्तीचे चांगले परिणाम :

कामगारांच्या स्थलांतर प्रवृत्तीचे काही चांगले परिणामही असतात. खेडयातील कामगार औद्योगिक केंद्राकडे गेल्यामुळे खेडयातील शेतीवरील अतिरिक्त लोकसंखेचा भार कमी होऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते. कारण शेतीचे होणारे तुकडीकरण व विभाजन काही प्रमाणात थांबले जाते. शिवाय शहरातील पैशाचा ओघ खेड्याकडे येऊन त्यामुळे शेतीत काही गुंतवणूक केली गेल्यामुळे शेतीची उत्पादनक्षमता वाढते व शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होते.

कामगारांचा मानसिक दृष्टिकोन व्यापक होतो. खेडयातील मजूर जेव्हा शहरात कामासाठी जातात तेव्हा त्यांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडून येतात. खेडयातील सामाजिक जीवन हे जातिव्यवस्थेवर आधारलेले, साचेबंद स्वरूपाचे व संकुचित चौकटीत सामावलेले असते. या उलट शहरातील जीवन विस्तृत व प्रवाही असते. त्यामुळे कामगारांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. औद्योगिक कामगारांच्या जीवनात व दृष्टिकोनात घडून येणाऱ्या या क्रांतिकारक परिवर्तनाचा चांगला परिणाम ग्रामीण जीवनावर घडून आल्याशिवाय रहात नाही.[३४]

ग्रामीण जीवनात सामाजिक बदलांच्या प्रक्रियेचा आरंभ होतो. खेडयातील कामानिमित्त शहरात गेलेल्या कामगारांचा दृष्टिकोन शहरात राहून व्यापक झालेला असतो. हे कामगार जेव्हा खेडयात येतात तेव्हा खेडयातील लोकांशी अनेक विषयावर चर्चा करतात. शहरात घडलेल्या घटनांची माहिती देतात आणि अज्ञानाच्या अंध:कारात सुख व समाधान मानून घेणाऱ्या समाजाला जग कोणत्या दिशेने चालले आहे, याबाबत कल्पना देतात. म्हणजे ते खेडयात लोकशिक्षणाचे कार्य करतात. स्वातंऱ्याच्या नव्या कल्पना व नवे विचार खेडयात रूजविण्याचे महत्वपूर्ण कार्य हे कामगार करीत असतात.[३५]

अशारितीने स्थलांतराच्या वरील सैध्दांतिक चौकटीच्या आधारे ` शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली ` या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस तोडणीचे काम करणाऱ्या कामगारांची सामाजिक, आर्थिक स्थिती तसेच या कामगारांच्या स्थलांतराचे स्वरूप, प्रमाण, रचना व दिशा आणि त्यांच्या समस्या याबाबत विश्लेषण करणे हा या लघुशोधनिबंधाचा मुख्य हेतू आहे.

## REFERENCES


1) Durkheim Emile, "The Division of Labour in Society", Trans. George Simpson, Macmillan, 1933, p.5.
2) Everett, S. Lee, "A Theory of Migration", a article in Demography, Vol. III, No. 1, 1966, pp. 47-57.
3) Ashish Bose, "Studies in India's Urbanisation", 1901-71 New Delhi, Tata McGraw Hill Publishing Co.Ltd., 1974, pp. 95-110.
4) Samuel A. Stouffer, "Intervening Opportunities - A Theory Relating Mobility and Distance" in American Sociological Review, V, 1940, pp. 845-67.
5) J. Clyde Mitchell, "The Causes of Labour Migration", in 'Demography', Columbia University Press, Vol. II, No. 2, 1961, p. 262.
6) Donald J. Bogue, "Internal Migration with Special Reference to A Rural Urban Movement", World Publication Conference, New York, 1957, p. 164.
7) Bogue, op.cit., p. 165.
8) John B. Parr, "Outmigration and the Depressed Area Problems", Land Economics, Vol. 42, 1966, pp. 149-159.
9) Gunnar Myrdal, "Economic Theory and Underdeveloped Regions", Vora and Co. Publishers Pvt.Ltd., Bombay, 1966, p. 39.
10) John B. Parr, op.cit., p. 159.
11) T.R. Anderson, "Intermetropolitan Migration : A Correlation Analysis", American Journal of Sociology, VI, 1956, pp. 459-462.

12) P.H. Landies, Educational Selectivity of Rural-Urban Migration and its Bearing on on Wage and Occupational adjustments - Rural Sociology, The Indian Journal of Social Work, Vol. No. XXX, No. 4, 1970, pp. 218-232.

13) Berg, "Backword Sloping Labour Supply function in Duel Economics," quoted in W.A. Hance, 'Population Migration and Urbanization in Africa-Columbia University Press, 1970, p. 480.

14) K.C. Zachariah, "A Historical Study on Internal Migration in Indian Subcontinent", 1901-1931 and 1941-51, Bombay, Asia Publishing House, 1964.

16) Report of Royal Commission on Labour, quoted in Dr.Prabhakar Deshmukh, Economics of Labour, Vidya Prakashan, Nagpur-2, p.21, Third Edition, 1987.

17) Report of Labour Investigation Committee, p. 58.

18) B.R. Sharma, The Industrial Workers : Some Myths and Realities, Economic and Political Weekly, May 30, 1970, pp. 877-878.

19) Manpower Documentation, Vol. X, No. 3, July-Sept. 1986, Soni, N.K., "Dimensions of Migration in India", Indian Journal of Economics, Oct. 1985, pp. 146-170.

20) Brinley Thomas, "The International Circulation of Human Capital" (1979), Article in 'Manpower Journal', Vol.XVI Jan./March 1981, p. 26, Institute of Applied Manpower Research, New Delhi.

21) S. Castles and G. Kosak, "Inmigrant Workers and the Class-structure", University Press, London, 1973, p. 477.

22) Brigg (1973), "Internal Labour Mobility and Economic Opportunities", in 'Manpower Journal', Vol. XVI, March, 1981, p. 53.

23) The Economic Times, 9th June, 1983, Article on 'The Effects of Inmigration', Eastern India, Assam.

24) Encyclopaedia Britanica, Vol. 12 (Depth Study Macropaedia), p. 185.

25) Ibid, p. 186 - quoted by Edward G. Ravenstein (British Statistician) in 'The Laws of Migration' Published in 1885.

26) Ibid.

27) A Phizacklea and R. Miles, "Labour and Racism", Routledge and Kegan Paul, London, 1980,p. 86 (by Philpott, S. (1978) West Indian Migration).

28) Report of the Royal Commission on Labour in India, 1931, p. 16.

29) The Labour Investigation Committee, Government of India, 1946,p. 77.

30) Clark, Kerr, J.F. Dunlop, P.H. Harbinson and C.A. Myers, "Industrialization and Industrial Man, p. 170.

31) Report of Labour Investigation Committee, 1946, p. 187.

32) Indian Labour Journals, March, 1981, p. 327.

33) Government of India, Economic Survey, 1975-76.

34) The Report of the Royal Commission on Labour, quoted in Dr. Prabhakar Deshmukh Economics of Labour, Vidya Prakashan, Nagpur-2, p. 22.

35) The Report of Royal Commission on Agriculture, 1955 (Government of India), p. 125.